खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ता. खेड, जि. पुणे

## द्वितीय वर्ष कला (SYBA)

## मराठी (जी - २)

## सत्र चोथे

## मराठी साहित्य : भाषिक कौशल्यविकास आणि आधुनिक मराठी

## साहित्यप्रकार : ललितगद्य (CC-1 D(3)A)

SANJAY MARATHI RM

## घटक २) 'साहित्यरंग' पाठ्यपुस्तक

## लेख १) ग्रंथप्रेम : शांता शेळके

डॉ. संजय शिंदे
उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ई - मेल : dr.sdshinde80@gmail.com   भ्रमणध्वनी क्र. : 9604309060

# ‘साहित्यारंग’ पाठ्यपुस्तक

ललितगद्यात आठवणी, अनुभव, प्रवासलेख, व्यक्तिचित्र, ललितलेख आदी रूपांतून लेखकाचे चिंतन, विचार, भावना, जीवनविषयक दृष्टिकोन सूक्ष्म, तरल, भावपर व सौंदर्यपूर्ण रीतीने प्रकट होत असतात. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय देणाऱ्या ललितगद्यात परिस्थितीला गौणत्व आणि अनुभवाला प्राधान्य दिलेले असते. म्हणूनच ललितगद्य हा समकालीन जीवनाचा संम्येक संदर्भांना समर्पक लालित्यपूर्ण शैलीतून आविष्कृत करणारा एक लवचिक व सर्वसमावेशक साहित्यप्रकार ठरतो. 'साहित्यरंग' या पुस्तकात ललित गद्याच्या या सर्व विषयांना कवेत घेणाऱ्या निवडक लेखांचे संपादन केले गेले आहे.

## ‘साहित्यरंग’ मधील लेख

**१) ग्रंथमित्र - शांता शेळके**

**२) परिनिवृत्त : 'विद्याभास्कर' मणिशंकर उपाध्याय : शरद पाटील**

**३) अरणी : मारुती चितमपल्ली**

**४) शब्दभ्रम, अर्थभ्रम : द. भि. कुलकर्णी**

**५) कोरडी भिक्षा : श्रीनिवास विनायक कुलकर्णी**

**६) सहावे सुख : यशवंत पाटणे**

**७) तुझ्या नादानं पाहिली तुझीच रे पंढरी... : जयंत पवार**

**८) ह्या न्हैच्या पैलतडी : प्रवीण दशरथ बांदेकर**

**९) ... आणि बुद्धाचा जन्म होतो : मनोज बोरगावकर**

**१०) पाखरं : संध्या रंगारी**

SANJAY MAR HRM

## १) ग्रंथमित्र - शांता शेळके

### लेखिका परिचय :

शांताबाईंचा जन्म इंदापूरचा. आजोळ राजगुरुनगर. शिक्षण एम.ए. काही काळ त्यांनी साप्ताहिक 'नवयुग' व दैनिक 'मराठा'त काम केले. रुईया आणि महर्षी दयानंद महाविद्यालयात प्राध्यापिका. भावगीतकार, चित्रपटगीतकार म्हणून त्यांची स्वतंत्र ओळख आहे. त्यांचे 'वर्षा', 'रुपसी', 'तोच चंद्रमा', 'गोंदन', 'कळ्यांचे दिवस', 'जन्मजान्हवी' इत्यादी कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'विझली ज्योत', 'पुनर्जन्म', 'धर्म', 'ओढ', 'मायेचा पाझर' इत्यादी कादंबऱ्याही प्रसिद्ध आहेत. 'सांगावेसे वाटले, म्हणून', 'जाणता अजाणता', 'वडीलधारी माणसे', 'धूळपाटी' इत्यादी ललितलेखन प्रसिद्ध आहे. सौंदर्यदृष्टी, रसिकता, मानवी मनोभूमिका आणि सहजता हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहेत. १९९६ मध्ये आळंदी येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा होत्या.

'ग्रंथमित्र' हा लेख **'धूळपाटी'** या ललित लेखसंग्रहातून घेतलेला आहे. या लेखातून शांता शेळके यांचे पुस्तकांशी असणारे मैत्रीचे नाते स्पष्ट होते. पुस्तकांची मित्रांशी तुलना केली जाते. काही मित्र हे आपल्या जीवनाचे साथी, सहचर, जिवलग होतात. या नात्यामध्ये स्वार्थ, अहंकार, व्यवहार नसतो. काही पुस्तके आपल्याशी तेवढ्या वेळापुरते; तर काही जन्मभराचे नाते जोडतात. आपल्याला ध्येयासाठी प्रेरित करतात. पुस्तकांचे हे नाते या लेखात प्रकट झाले आहे.

### 'ग्रंथप्रेम' लेखातील आशय :

शांता शेळके यांचे वडील **रेंज फॉरेस्ट ऑफिसर** होते. **आई-वडिलांना वाचनाची आवड** असल्याने घरी अनेक कथा-कादंबऱ्या, नाटके तसेच भारत गौरव ग्रंथमाला, हिंद एजन्सी माला, महाराष्ट्र कुटुंबमाला अशी मालांची पुस्तके होती. त्यात राम गणेश गडकरी, हरिभाऊ आपटे, गो.ब. देवल, अण्णासाहेब किर्लोस्कर, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यासारख्या लेखकांची पुस्तके होती. वडील पुण्या-मुंबईहून येताना पुस्तके घेऊन येत. **'गृहलक्ष्मी'** हे त्या काळातले स्त्रीजीवनविषयक प्रसिद्ध मासिक त्यांच्या घरी येत असे. परिणामी या **कौटुंबिक ग्रंथ संस्काराचा** त्यांच्या वाचन अभिरुचीवर प्रभाव पडला होता.

शांताबाईंच्या नवव्या वर्षी त्यांच्या वडिलांचे निधन झाले. पुढे त्या त्यांच्या **काकांकडे पुण्यात** राहावयास गेल्या. त्यांचे **सर्व शिक्षण पुण्यात** झाले. शाळा महाविद्यालयात शिक्षण घेताना पुस्तकांच्या सहवासात त्यांना



SANJAY MAR HRM

राहाता आले. त्यांनी सुरुवातीला **'मेघदूत', मम्मटाचा 'काव्यप्रकाश' आणि 'हॅम्लेट'** ही तीन पुस्तके विकत घेतली. **लेखन आणि अध्यापन** हा जन्मभराचा व्यवसाय असल्याने त्या पुस्तकांच्या सहवासात रमत गेल्या. त्यांच्या संग्रहात पौराणिक, संत साहित्य तसेच मराठी-इंग्रजी भाषेतील ग्रंथसंपदा विपूल प्रमाणात जुळत गेली.

**मोरोपंतांचा 'श्लोककेकावली'** हा त्यांचा आवडता ग्रंथ. तर **माधव ज्यूलियन** हे त्यांचे आवडते कवी. त्यांचे 'गज्जलांजली', 'विरहतरंग' हे कवितासंग्रह शांता शेळके यांचे तोंडपाठ होत. **'संस्कृत सुभाषितरत्नभांडार'** हा अप्रतिम ग्रंथ त्यांच्या संग्रही होता. स. आ. जोगळेकर यांनी अनुवादीत केलेला **'गाथासप्तशती'** हा ग्रंथ मिळवण्यासाठी त्या खूप धडपडल्या. एका ओळखीच्या बाईंना असलेल्या पैशाच्या नडीतून त्यांना शब्दकोशाचे खंड खरेदी करता आले. अवघ्या दोन-तीन रूपयात 'छंदोरचना' हा ग्रंथ शांता शेळके यांना **माहिमच्या फुटपाथवर** मिळाला. **शंतनुराव किर्लोस्कर यांनी त्याना वाढदिवसाच्या निमित्ताने माधव ज्यूलियन यांच्या कवितासंग्रहाचे दोन खंड भेट दिले.** मुंबईतील स्ट्रेड बुकमध्ये तासन तास बसून वाचलेली आणि त्या दुकानच्या मालकांनी दिलेली पुस्तके आणि फुटपाथवर नवयुग आणि मनोरंजन मासिकाचे मिळालेले जुने अंक या संदर्भातील माहिती वाचताना शांताबाईंचे ग्रंथप्रेम विशेषत्वाने दिसून येते. **टी.एस.एलियट** यांनी मांजरावर लिहिलेल्या कवितांचा संग्रह त्यांच्याकडे होता.

लहानपणापासून **पुस्तकांना कव्हर घालण्याचा** त्यांना छंद होता. 'कव्हर पुस्तकांना नाही तर माझ्या मनाला घालते', असे त्या म्हणत. नव्याकोऱ्या पुस्तकाच्या पहिल्या **पानावर सही करण्याची सवय** मात्र त्यांनी काळानुरूप सोडून दिली. 'कोऱ्या पुस्तकाला आपल्या शूद्र नावाचा स्पर्श कशाला', असे त्या म्हणतात. 'उद्या आपले बरेवाईट झाले तर ही कोरीकरकरीत पुस्तके अशीच कुणाकुणाला पुस्तकवेड्यांना घेऊन जाता येतील... ते त्यावर प्रेमाने आपली नावे घालतील..... त्यांना जीवापाड जपतील...' अशी भावना त्या व्यक्त करतात.

शांता शेळके यांचे 'ग्रंथप्रेम' हा केवळ छंद नाही तर धर्म असल्याची प्रचिती आपल्याला या लेखातून येते. एकंदरीतच, हा लेख वाचल्यानंतर उत्कट साहित्यप्रेम, रसिकता, साहित्याविषयीचे सर्वस्पर्शी कुतूहल हे शांताबाई शेळके यांची उल्लेखनीय गुणविशेष जाणवतात. तसेच साहित्याकडे बघण्याची त्यांची दृष्टी निकोप आणि पूर्वग्रहरहित असल्याचेही जाणवते.



SANJAY MAR HRM

## सराव प्रश्नसंच

१) 'ग्रंथमित्र' या लेखातून शांता शेळके यांचे कोणते गुणविशेष जाणवतात ?

A) उत्कट साहित्यप्रेम

B) साहित्याविषयीचे सर्वस्पर्शी कुतूहल

C) रसिकता

**D) वरील सर्व**

२) शांता शेळके यांची साहित्याकडे बघण्याची दृष्टी कशी आहे ?

**A) निकोप व पूर्वग्रहरहित** B) व्यापक C) अमर्याद D) संकुचित

३) शांता शेळके यांच्या ग्रंथ संग्रहातील पुस्तके कशामुळे कमी होत असत ?

A) विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनी वाचावयास नेलेली पुस्तके गायब केल्यामुळे

B) पाण्यात भिजणे, वाळवी लागणे, फाटने अशा नैसर्गिक आपत्तीमुळे अकाली मृत्यू ओढवल्याने

C) पुणे-मुंबई स्थलांतरात नाहीशी झाल्याने व जुनी पुस्तके काढून टाकल्याने

**D) वरील सर्व**

४) लेखिकेच्या ग्रंथसंग्रहात भर कशी पडते ?

A) लेखक प्रकाशकांकडून भेट

B) नवी पुस्तक खरेदी

C) रस्त्यावरच्या पुस्तक विक्रेत्यांकडून खरेदी

**D) वरील सर्व**

५) अवघ्या दोन-तीन रूपयात 'छंदोरचना' हा ग्रंथ शांता शेळके यांना कोठे मिळाला ?

A) पुस्तकाच्या दुकानात

**B) माहिमच्या फुटपाथवर**

C) प्रकाशकांकडे

D) लेखकाकडून

६) कोणत्या ग्रंथसंग्रहाबद्दल लिहावे असा प्रश्न लेखिकेला का पडला ?

**A) ग्रंथसंग्रह नेहमी बदलतो**

B) विषयानुसार लिहिणे कठीण वाटते

C) पुस्तकांची संख्या खूप होती

C) वेळ कमी होता

SANJAY MAR HRM

७) लेखिकेमध्ये वाचनाची आवड कशी निर्माण झाली ?

A) पुस्तकांच्या सहवासाने

B) वडिलांच्या वाचन वेडामुळे

C) आईच्या वाचन आवडीमुळे

**D) वरील सर्व**

८) लेखिकेचे वडील कोण होते ?

A) शिक्षक B) प्राध्यापक **C) रेंज फॉरेस्ट ऑफिसर** D) व्यावसायिक

९) वडिलांची पुस्तके खरेदी कोठून होत असे ?

**A) पुणे-मुंबई** B) कोल्हापूर C) नाशिक D) सांगली

१०) शांता शेळके यांचे वडील आईसाठी कोणते स्त्रीविषयक मासिक नियमितपणे खरेदी करीत ?

A) राष्ट्रशोभा **B) गृहलक्ष्मी** C) गृहस्वामिनी D) लक्ष्मी

११) वयाच्या नवव्या वर्षी वडिलांच्या निधनामुळे लेखिकेचे कुटुंब कोठे राहावयास आले ?

A) इंदापूर B) राजगुरुनगर **C) पुण्याला काकांकडे** D) मंचर

१२) लेखिकेचे शाळा कॉलेजमधील शिक्षण कोठे झाले ?

**A) पुणे** B) मुंबई C) मंचर D) राजगुरुनगर

१३) कॉलेज जीवनात लेखिकेच्या ग्रंथसंग्रहाची सुरुवात कोणत्या पुस्तकांपासून झाली ?

A) मम्मटाचा काव्यप्रकाश B) मेघदूत C) हॅम्लेट **D) वरील सर्व**

१४) पुस्तकाशी संबंधित येणारे कोणते व्यवसाय लेखिकेने जन्मभर केले ?

**A) लेखन व अध्यापन** B) लेखन C) अध्यापन D) वाचन, कथालेखन

१५) लेखिकेच्या जीवनातील पहिले प्रेम कोणते ?

A) लेखन B) अध्यापन **C) वाचन** D) प्रवास

SANJAY MAR HRM

१६) लेखिकेला विलक्षण प्रिय काय आहे ?
A) पुस्तकाचे शारीरिक व मानसिक जवळीक
B) पुस्तकाचे रंगरूप व स्पर्श
C) जुन्या पुस्तकाचा चॉकलेट सारखा गोडसर व नव्या पुस्तकाचा ताजा वास
**D) वरील सर्व**

१७) माझ्या वाचनाला ..........नाही तसेच माझ्या ग्रंथसंग्रहालही .............. नाही ?
A) शिस्त B) पूर्वनियोजन **C) शिस्त, पूर्वनियोजन** D) चौकट

१८) शांता शेळके यांच्या ग्रंथसंग्रहाला नियोजनबध्दतेऐवजी चित्रविचित्र अस्ताव्यस्त पण आकर्षक स्वरूप का आले आहे ?
A) आर्थिक असमर्थता
B) सर्व पुस्तके हवीशी वाटतात
C) आळशीपणामुळे
**D) पर्याय A व B बरोबर**

१९) बालवयात वाचलेल्या पुस्तकाबद्दल लेखिकेला काय वाटते ?
**A) नॉस्टाल्जिक आकर्षण**
B) पुर्नवाचनातून सुखी, बालपणाचा पुन:प्रत्यय येतो
C) वर्तमानातीलन समस्या व अडचणींपासून सुरक्षित भावना
D) वरील सर्व

२०) बालपणापासून शांता शेळके यांना कशाची आकर्षण वाटते ?
**A) अद्भुतरम्य कथा व रहस्यमयता** B) वैचारिक वाचन C) लेखन D) कथाकथन

२१) कविता संग्रह व संत साहित्य जाणीवपूर्वक संग्रहित करणाऱ्या लेखिकेला कोणत्या साहित्यप्रकाराचे आकर्षण वाटत नाही ?
**A) कादंबरी** B) नाटक C) कथा D) कविता

२२) शेक्सपियर, गडकरी, देवल यांची नाटके लेखिकेला का आवडतात ?
A) काव्यगुण
B) भाषेतील लालित्य
C) आशय
**D) पर्याय A व B बरोबर**




SANJAY MAR HRM

२३) आपले आवडते कवी माधव ज्यूलियन यांच्या कोणत्या काव्यसंग्रहाच्या दहा-बारा प्रती लेखिकेने जमवल्या आहेत ?

A) गज्जलांजली **B) विरहतरंग** C) मालतीमाधव D) काव्यकिरीट

२४) कॉलेजमधून सेवानिवृत्त होताना मित्र-मैत्रिणींनी लेखिकेस भेट म्हणून दिलेल्या इंग्रजी पक्षीविषयक कविता संग्रहाचे नाव काय ?

**A) कोरस** B) विरहतरंग C) मालतीमाधव D) काव्यकीरीट

२५) शंतनू किर्लोस्करांनी वाढदिवसाच्या दिवशी लेखिकेस कोणते पुस्तक भेट दिले ?

**A) माधव जूलियन यांच्या कवितांचे दोन खंड**

B) मालतीमाधव

C) गज्जलांजली

D) काव्यकिरीट

२६) पुस्तकाच्या बाबतीत लेखिकेला बालपणापासून कोणत्या सवयी होत्या ?

A) पुस्तकाला कव्हर लावणे

B) पुस्तक हातात आले की पहिल्या पानावर स्वतःची सही करणे

C) पुस्तकाला कपाटात ठेवणे

**D) पर्याय A व B बरोबर**

---

**अध्यापन साहित्य निर्मिती :**

**डॉ. संजय शिंदे**

**हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

**संदर्भ ग्रंथ :**

**१) साहित्यरंग : डॉ. शिरीष लांडगे व इतर (संपादक)**

SANJAY MAR HRM